महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक –८४३/११९ दिनांक :- १५ सप्टेंबर, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडामध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा

**आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात स्किल अपग्रेडेशन हीच यशाची गुरुकिल्ली –** 'म्हाडा' उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल

मुंबई, दि. १५ सप्टेंबर : “आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यामध्ये झपाट्याने होत असलेली प्रगती ही सर्वच क्षेत्रांसाठी आव्हानात्मक आहे. अशा परिस्थितीत म्हाडा सारख्या अभियांत्रिकी संस्थेतील अभियंत्यांनी कौशल्य वृद्धी (Skill Upgradation) व वैयक्तिक प्रगती (Self Enhancement) यावर विशेष लक्ष केंद्रित करणे ही काळाची गरज आहे. कार्यक्षमता आणि कौशल्य हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे,” असे प्रतिपादन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी आज केले.

म्हाडा अभियंता वर्गातर्फे भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त आयोजित “अभियंता दिन” कार्यक्रमात श्री. जयस्वाल बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, कोणत्याही संस्थेचे यश हे त्या संस्थेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांवर अवलंबून असते. म्हणूनच टीम वर्क या संकल्पनेला मी प्राधान्य देतो. म्हाडाचे कार्य आज राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाले असून, आता आंतरराष्ट्रीय स्तरावर म्हाडाचे नावलौकिक घेऊन जाणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे व त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील राहूया असे आवाहन, श्री जयस्वाल यांनी याप्रसंगी सर्व अभियंत्यांना केले. .

कार्यक्रमास मुंबई इमारत सुधार व पुनर्विकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर (भा.प्र.से.), मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर (भा.प्र.से.), म्हाडाचे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदिरकर, श्री. महेशकुमार जेसवाणी, श्री. ननावरे तसेच उपमुख्य अभियंता श्री. राकेश गावीत यांनीही उपस्थितांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. याशिवाय म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखेडे, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. सतीश भारतीय यांच्यासह म्हाडा अभियंता वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या प्रसंगी म्हाडामधील पदोन्नती प्राप्त अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच म्हाडाचे अभियंता श्री. महादेव शितोळे लिखित “जगभरातील भूकंप : स्वरूप, भ्रम आणि वास्तव” या पुस्तकाचे प्रकाशन श्री. जयस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले. भूकंपाच्या शास्त्रीय कारणांचा अभ्यास, त्याविषयी असलेले समज-गैरसमज व वस्तुस्थिती यावर हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान एलबी-डब्ल्यूएसपी या सल्लागार संस्थेचे सहाय्यक निवासी अभियंता श्री. विश्वास चिंचोरे यांनी “मुंबई-पुणे दुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्प” या विषयावर व्याख्यान दिले. तसेच जीवनविद्या मिशनचे उपदेशक प्रल्हाद वामनराव पै यांनी “ताण-तणाव व्यवस्थापन व काम-जीवन समतोल” या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

X @mhadaofficial  Facebook @mhadaofficial  Instagram @mhadaofficial  YouTube @mhadaofficial


ENGINEER'S DAY
2025
म्हाडा
MHADA
म्हाडा
MHADA
HAPPY ENGINEERS DAY
2025


ENGINEER'S DAY
2025
म्हाडा
MHADA